# होशेय

## परमेश्वराचा होशेयतर्फे संदेश

1 बैरीचा मुलगा होशेय याला परमेश्वराचा संदेश आला,
त्या वेळेस उज्जीया, योथाम, आहाज आणि हिज्कीया
हे यहूदाचे राजे होते. व योवाशाचा मुलगा यराबाम
इस्राएलावर राज्य करीत होता.
2हा होशेयला आलेला परमेश्वराचा पहिलाच संदेश
होता. परमेश्वर म्हणाला, “जा आणि वेश्येशी लग्न कर.
तिला मुले होऊ देत. का? कारण ह्या देशातील लोक
वेश्येप्रमाणेच वागले आहेत. त्यांनी परमेश्वराचा
विश्वासघात केला आहे.”

## इज्रेलचा जन्म

3म्हणून होशयने दिब्लाइमाची मुलगी गोमर हिच्याशी
लग्न केले. तिला दिवस गेले व तिला मुलगा झाला.
4परमेश्वराने होशेयला सांगितले, “या मुलाचे नाव
इज्रेल ठेव. का? कारण लवकरच, येहू घराण्याने
इज्रेल दरीत जो रक्तपात केला, त्याबद्दल मी त्यांना
शिक्षा करणार आहे. मग मी इस्राएल राष्ट्रांचा शेवट
करीन. 5त्या वेळी मी इज्रेल दरीत, इस्राएलाचे धनुष्य
मोडीन.”

## लो-रूहामाचा जन्म

6मग गोमरला पुन्हा दिवस गेले. ह्या खेपेस तिने एका
मुलीला जन्म दिला. परमेश्वर होशेयला म्हणाला, “तिचे
नाव लो-रूहामा ठेव. का? कारण मी यापुढे इस्राएल
राष्ट्राला अजिबात दया दाखविणार नाही. मी त्यांना क्षमा
करणार नाही. 7पण मी यहूदावर दया करीन. मी यहूदा
राष्ट्राला वाचवीन, त्यांना वाचविण्यासाठी मी धनुष्य
किंवा तलवार यांचा उपयोग करणार नाही, किंवा घोडदळ
वा सैनिक यांचा वापर करणार नाही. मी माझ्या सामर्थ्याच्या
बळावर त्यांना तारीन.”

## लो-अम्मीचा जन्म

8मग लो-रूहमेचे दूध तुटल्यावर गोमरला पुन्हा दिवस
गेले या खेपेला तिने एका मुलाला जन्म दिला. 9परमेश्वराने
त्या मुलाचे नाव “लो-अम्मी ठेवण्यास सांगितले. का?
कारण तुम्ही माझे लोक नव्हेत व मी तुमचा परमेश्वर
नाही.”

## इस्राएल लोकांच्या बहुसंख्यत्वाविषयी परमेश्वराचे वचन

10“भविष्यकाळात, समुद्रकाठच्या वाळूच्या कणांप्रमाणे
इस्राएली लोक असतील. तुम्ही वाळू मापू वा मोजू शकत
नाही. मग ‘तुम्ही माझे लोक नव्हत’ असे ज्यांना म्हणण्यात
आले, ‘त्याऐवजी त्यांना तुम्ही जिवंत परमेश्वराची लेकरे
आहात.’ असे म्हणण्यात येईल.
11“मग यहूदाचे व इस्राएलचे लोक एकत्र येतील. ते
त्यांच्यासाठी एक राजा निवडतील. त्याचे राष्ट भूप्रदेशापेक्षा
खूपच मोठे असेल. तेव्हा इज्रेलचा दिवस खरोखर चांगला
असेल.”

2 “मग तुम्ही तुमच्या भावांना ‘तुम्ही माझे आहात’
आणि बहिणींना ‘त्याने तुमच्यावर दया केली’ असे
म्हणाल.”

## इस्राएल राष्ट्राशी परमेश्वर बोलतो

2“तुम्ही आपल्या आईशी वाद घाला. खुशाल वाद
घाला. कारण ती माझी पत्नी नाही व मी तिचा पती
नाही. वेश्येप्रमाणे वागण्याचे सोडून देण्यास तिला सांगा.
तिच्या स्तनापासून तिला तिच्या प्रियकरांना दूर करण्यास
सांगा. 3तिने जर व्यभिचार करण्याचे सोडण्यास नकार
दिला तर मी तिला नग्न करीन. तिला मी तिच्या
जन्माच्या वेळच्या अवस्थेप्रमाणे टाकीन. मी तिचे लोक
काढून घेईन मग ती ओसाड रूक्ष वाळवंटाप्रमाणे
होईल, मी तिला तहानेने मारीन. 4तिची मुले ही
वेश्येची मुले असल्याने मला त्यांची कीव येणार
नाही. 5त्यांची आई वेश्येप्रमाणे वागली. तिला
तिच्या कर्मांची लाज वाटली पाहिजे. ती म्हणाली, ‘मी
माझ्या प्रियकराकडे जाईन ते मला अन्नपाणी देतील.
ते मला लोकर, कापड, मद्य व जैतूनेचे तेल
देतील.’
6“म्हणून, मी (परमेश्वर) तुझा (इस्राएलचा) रस्ता काटे
पसरवून आडवीन. मी भिंत बांधीन मग तिला मार्ग सापडू
शकणार नाही. 7ती तिच्या प्रियकरांमागून धावेल पण
त्यांना ती गाठू शकणार नाही. ती तिच्या प्रियकरांना
शोधील, पण ते तिला सापडणार नाहीत. मग ती म्हणेल,
‘मी माझ्या पहिल्या पतीकडे (परमेश्वराकडे) परत जाईन.

मी त्याच्याजवळ असताना माझे जीवन ह्याहून चांगले होते. आतापेक्षा ते आयुष्यच बरं होते.'

8"तिला धान्य, मद्य आणि तेल देणारा मीच एकमेव (परमेश्वर) आहे, हे तिला (इस्राएलाला) कळले नाही. मी तिला आणखी चांदी-सोने देत राहिलो पण इस्राएली लोकांनी त्या चांदी-सोन्याचा उपयोग बआलच्या मूर्ती घडविण्याकरिता केला. 9म्हणून, मी (परमेश्वर) परत येईन. मी धान्य पिकताच माझे धान्य व द्राक्षे तयार होताच धान्य आणि द्राक्षरस परत घेईन. मी तिला तिचे उघडे शरीर झाकण्यासाठी दिलेली लोकर व कापड परत घेईन. 10आता मी तिला उघडी करीन. ती नग्न होईल व तिचे सर्व प्रियकर तिला पाहू शकतील. माझ्या सामर्थ्यापासून तिचा कोणीही बचाव करू शकणार नाही. 11मी तिचा सर्व आनंद नष्ट करीन. तिच्या सुट्या तिच्या अमावस्येच्या मेजवान्या व विश्रांतीचे दिवस मी काढून घेईन. तिच्या खास मेजवान्या मी बंद करीन. 12मी तिच्या द्राक्षवेलींचा व तिच्या अंजिराच्या झाडांचा नाश करीन. ती म्हणाली होती, 'माझ्या प्रियकरांनी मला या गोष्टी दिल्या' पण मी तिच्या बागांचे रूप पालटून टाकीन. त्या जंगलाप्रमाणे होतील. वन्य पशू येऊन झाडे खातील.

13"तिने बालाची सेवा केली, म्हणून मी तिला शिक्षा करीन. तिने त्यांच्यापुढे धूप जाळला. तिने साजशृंगार केला. तिने दागदागिने व नथनी घातली मग ती तिच्या प्रियकरांकडे गेली व मला विसरली." परमेश्वरच असे म्हणाला:

14"म्हणून मी (परमेश्वर) तिला शिकवीन. मी तिला वाळवंटात नेईन. मी तिच्याशी प्रेमाने बोलेन. 15तेथे मी तिला द्राक्षमळे देईन अखोरची दरी आशेचे द्वार म्हणून देईन. मग तिच्या तरुणपणी मिसर देशातून बाहेर आल्यावर ज्याप्रमाणे तिने प्रत्युत्तर दिले होते, तसे ती देईल." 16परमेश्वरच असे म्हणतो.

"त्या वेळेला 'तू मला माझा पती' म्हणून संबोधशील. मला 'माझा बआल* असे म्हणणार नाहीस. 17मी तिच्या तोंडातून बालाचे नाव काढून टाकीन. मग लोक कधीही बालाचे नाव घेणार नाहीत.

18"त्या वेळेला, मी इस्राएली लोकांसाठी रानातल्या प्राण्यांबरोबर, आकाशातील पक्ष्यांबरोबर आणि जमिनीवर सरपटणाऱ्या प्राण्यांबरोबर एक करार करीन. मी धनुष्य तलवार व युध्दात वापरण्यात येणारी शस्त्रे मोडून टाकीन. त्या देशात एकही शस्त्र राहणार नाही. मी देश सुरक्षित करीन, त्यामुळे इस्राएलचे लोक शांतीने झोप घेतील. 19आणि मी (परमेश्वर) तुला माझी चिरंतन वधू करीन. मी चांगुलपणा, न्याय, प्रेम व दया यांच्यासह तुला वधू करून घेईन. 20मी तुला माझी विश्वासू वधू बनवीन. मग तू परमेश्वराला खरोखर जाणशील. 21मी त्या वेळेला प्रत्युत्तर देईन." परमेश्वर असे म्हणतो.

"मी आकाशाशी बोलेन व तो पृथ्वीवर पाऊस पाडील.
22भूमी धान्य, मद्य व तेल देईल. त्यामुळे इज्रेलच्या गरजा भागतील.
23तिच्या भूमीत मी तिचे पुष्कळ बीज* पेरीन. लो-रूमाहावर मी दया करीन. लो-अम्मीला मी 'माझे लोक' म्हणीन. मग ते मला 'तू माझा परमेश्वर' मानतील.'"

## होशेय गोमरला विकत घेऊन गुलामगिरीतून परत आणतो

**3** मग परमेश्वर पुन्हा मला म्हणाला, "गोमरला खूप प्रियकर आहेत पण तू तिच्यावर प्रेम करीत राहिलेच पाहिजे. का? कारण परमेश्वर तसेच करतो. परमेश्वर इस्राएल लोकांवर सतत प्रेम करतो, पण ते लोक मात्र इतर दैवतांची पूजा करीत राहतात. त्यांना मनुकांच्या ढेपा खाणे आवडते."

2म्हणून मी सहा औस चांदी व 9 बुशेल जव देऊन गोमरला विकत घेतले. 3मग मी तिला म्हणालो, "खूप दिवस तू माझ्याबरोबर घरात राहिले पाहिजेस. तू वेश्येप्रमाणे वागता कामा नयेस. तू दुसऱ्या पुरुषाबरोबर जाणार नाहीस. मीच तुझा पती असेन."

4ह्याचप्रमाणे, पुष्कळ दिवस इस्राएली लोकांना राजावाचून वा नेत्यावाचून काळ कंठावा लागेल. त्यांना बळी, स्मृतिशिळा, एफोद वा घराण्याचा देव यांच्यावाचून राहावे लागेल. 5ह्यानंतर इस्राएलचे लोक परत येतील. मग ते परमेश्वराला म्हणजेच त्यांच्या देवाला आणि दावीदाला म्हणजेच त्यांच्या राजाला शोधतील. शेवटच्या दिवसांत, ते परमेश्वराचा व त्याच्या चांगुलपणाचा आदर करतील.

## परमेश्वर इस्राएलवर रागावला आहे

**4** इस्राएलच्या लोकांनो, परमेश्वराचा संदेश ऐका! ह्या देशात राहणाऱ्या लोकांविरुध्द परमेश्वर आपले म्हणणे मांडणार आहे. "ह्या देशातील लोकांना परमेश्वराची खरीखुरी ओळख नाही. ते सत्याने वागत नाहीत आणि परमेश्वराशी एकनिष्ठ नाहीत. 2लोक शपथ घेतात, खोटे बोलतात, ठार मारतात आणि चोरी करतात ते व्यभिचाराचे

**माझा बआल** ही शब्दखेळी आहे. बाल ह्या नांवाचा अर्थ "प्रभू किंवा पति" असाही होतो.

**पुष्कळ बीज** इज्रेल, लो-रूहामा, आणि लो-अम्मी होशयाची मुले आहेत. पण ह्या नावांना आणखीही विशेष अर्थ आहेत. इज्रेल ह्या नावांचा अर्थ "देव बिया पेरील." परंतु इस्राएलमधील एका मोठ्या खोऱ्याचेपण नांव इज्रेल आहे. हे असे दर्शविते की बहुधा देव त्याच्या लोकांना परत इस्राएलमध्ये आणील. लो-रूहामाचा अर्थ "तिला दया दाखविण्यात आली नाही." आणि लो-अम्मी म्हणजे "माझे लोक नव्हत."

पाप करतात आणि त्यांना मुले होतात ते पुन्हा पुन्हा खून
करतात. 3म्हणून देश, मृतासाठी शोक करणाऱ्या
माणसाप्रमाणे झाला आहे. देशातील सर्व लोक दुर्बल झाले
आहेत. रानातील प्राणी, आकाशातील पक्षी आणि समुद्रातील
मासेसुध्दा मरत आहेत. 4कोणीही दुसऱ्याशी वाद घालू
नये वा दुसऱ्याला दोष देऊ नये. हे याजका! माझा वाद
तुझ्याबरोबर आहे.* 5तुम्ही (याजक) दिवसा-ढवळ्या
पडाल आणि रात्री, तुमच्याबरोबर संदेष्टे पडतील. मी
तुमच्या आईचा नाश करीन.

6"माझ्या लोकांचा अज्ञानामुळे नाश झाला. तुम्ही
शिकण्याचे नाकारले आहे. म्हणून मी तुम्हाला माझ्या
सेवेत याजक होण्यास नकार देईन. तुम्ही तुमच्या देवाचा
नियम विसरलात, म्हणून मी तुमच्या मुलांना विसरेन. 7ते
गर्विष्ठ झाले, त्यांनी माझ्याविरुद्ध खूप पाप केले. म्हणून
मी त्यांचे वैभवाचे लाजिरवाण्या स्थितीत रूपांतर करीन.

8"लोकांच्या पापांमध्ये याजक सहभागी झाले. त्यांना ती
पापे आणखी पाहिजे आहेत. 9म्हणजेच याजक लोकांपेक्षा
वेगळे नाहीत. त्यांनी केलेल्या दुष्कृत्यांबद्दल मी त्यांना
शिक्षा करीन. त्यांच्या चुकांची मी परतफेड करीन. 10ते
खातील, पण त्यांची तृप्ती होणार नाही. ते व्यभिचाराचे पाप
करतील, पण त्यांना मुले होणार नाहीत. का? कारण
त्यांनी परमेश्वराचा त्याग केला आणि वेश्येप्रमाणे वर्तन
केले. 11व्यभिचार, कडक पेय, व नवीन मद्य माणसाची
सरळ विचार करण्याची ताकद नष्ट करतील. 12माझी
माणसे लाकडाच्या तुकड्यांना सल्ला विचारीत आहेत.
त्यांना वाटते की त्या काटक्या त्यांना उत्तर देतील. का?
कारण ते वेश्यांप्रमाणे त्या खोट्या देवाच्या मागे धावले.
त्यांनी त्यांच्या देवाचा त्याग केला व ते वेश्येप्रमाणे वागले.
13पर्वतमाथ्यांवर ते बळी देतात आणि डोंगरांवर अल्लोन
लिबने व एला या वृक्षांखाली धूप जाळतात. ह्या वृक्षांची
छाया चांगली असते. म्हणून तुमच्या मुली त्या वृक्षांखाली
वेश्यांप्रमाणे झोपतात, आणि तुमच्या सुना व्यभिचाराचे
पाप करतात.

14"मी तुमच्या मुलींनी वेश्या झाल्याबद्दल वा तुमच्या
सुनांना व्यभिचाराचे पाप केल्याबद्दल दोष देऊ शकत
नाही. पुरुष वेश्यांकडे जातात व त्यांच्याबरोबर झोपतात.
ते मंदिरातील कलावंतिणीबरोबर बळी अर्पण करतात.
म्हणजेच ते मूर्ख लोक स्वत:चाच नाश करून घेत आहेत.

## इस्राएलाची लज्जास्पद पापे

15"इस्राएल, तू वेश्येप्रमाणे वागतेस. पण यहूदाला अपराध
करु देऊ नयेस. तू गिल्गालला किंवा वर बेथ-आवेनला
जाऊ नकोस. वचने देताना परमेश्वराच्या नावाचा उपयोग
करू नकोस 'परमेश्वराशपथ' असे म्हणू नकोस.
16"परमेश्वराने इस्राएलला खूप गोष्टी दिल्या आहेत. खूप
गवत असलेल्या विस्तीर्ण कुरणात आपल्या मेंढ्यांना घेऊन
जाणाऱ्या मेंढपाळाप्रमाणे परमेश्वर आहे. पण इस्राएल पुन्हा
पुन्हा पळून जाणाऱ्या कालवडीप्रमाणे हट्टी आहे.
17एफ्राईमने त्याच्या मूर्तीशी हातमिळवणी केली आहे.
तेव्हा त्याला ऐकटा ठेवा.

18"एफ्राईम त्यांच्या धुंदीत सामील झाला आहे. मद्यपान
केल्यानंतर ते वेश्यांप्रमाणे वागत आहेत. ते आपल्या
प्रियकरांकडून लाजिरवाण्या भेटी मागतात. 19ते
संरक्षणासाठी त्या दैवतांजवळ गेले आणि त्यांनी आपली
विचार करण्याची शक्ती गमावली. त्यांनी अर्पण केलेले
बळी त्यांना नामुष्कीच आणतात."

## नेत्यांनी इस्राएलला व यहूदाला पाप करायला भाग पाडले

5 "याजकांनो, इस्राएल राष्ट्रा आणि राजाच्या
घराण्यातील लोकांनो, माझे म्हणणे ऐका. कारण हा
निवाडा तुमच्यासाठी आहे.
"तुम्ही मिस्पातील सापळ्याप्रमाणे आहात. ताबोरच्या
भूमीवर पसरलेल्या जाळ्याप्रमाणे तुम्ही आहात. 2तुम्ही
पुष्कळ वाईट कृत्ये केली आहेत, म्हणून मी तुम्हा साऱ्याना
शिक्षा करीन. 3एफ्राईमला मी ओळखून आहे. इस्राएलची
कृत्ये मला महीत आहेत. एफ्राईम, आता, यावेळी तू
वेश्येप्रमाणे वागत आहेस. इस्राएल पापाने बरबटली आहे.
4इस्राएलच्या लोकांनी खूप वाईट गोष्टी केल्या आहेत,
त्या वाईट गोष्टी त्यांना परमेश्वराकडे परत येण्यास
अडथळा करतात. ते नेहमी दुसऱ्या दैवतांच्या मागे मागे
जाण्याच्या मार्गाचाच विचार करतात. ते परमेश्वराला
ओळखत नाहीत. 5इस्राएलचा अहंकार त्यांच्याविरुध्द
पुरावा आहे. म्हणून इस्राएल आणि एफ्राईम त्यांच्या पापांना
अडखळतील. त्यांच्याबरोबर यहूदाही अडखळेल.
6"लोकांचे नेते परमेश्वराचा शोध घेतील. ते
त्यांच्याबरोबर त्यांच्या 'मेंढ्या' व 'गायी' घेतील. पण त्यांना
परमेश्वर सापडणार नाही. का? कारण त्याने त्या लोकांचा
त्याग केला आहे. 7ते परमेश्वराशी प्रामाणिक राहात
नाहीत. त्यांची मुले परक्यांपासून झालेली आहेत. आता
परमेश्वर त्यांचा आणि त्यांच्या देशाचा पुन्हा नाश करील."

## इस्राएलच्या नाशाचे भविष्य

8"गिबात शिंग फुंका, रामात तुतारी फुंका.
बेथ-आवेनमध्ये इषारा द्या. बन्यामीन, तुझ्यामागे शत्रू
लागला आहे.
9शिक्षेच्या वेळी एफ्राईम ओसाड होईल ह्या गोष्टी नक्की
घडून येतील, असा खात्रीपूर्वक इषारा मी (परमेश्वर)
इस्राएलच्या घराण्यांना देतो.

---

**माझा वाद तुझ्याबरोबर आहे** किंवा "लोक एखाद्यविषयी तक्रार किंवा आरोप करू शकत नाहीत. लोक याजकाबरोबर वाद घालण्याप्रमाणे असाहाय्य आहेत." पुष्कळ वेळा याजक व लेवी न्यायाधिशाचे काम करीत असत आणि त्यांचे निर्णय अंतिम असत.

10दुसऱ्यांची मालमत्ता चोरणाऱ्या चोरांसारखे यहूदाचे नेते आहेत. म्हणून मी (परमेश्वर) माझ्या रागाचा त्यांच्यावर पाण्याप्रमाणे वर्षाव करीन.

11एफ्राईमला शिक्षा होईल. द्राक्षांप्रमाणे तो चिरडला व दाबला जाईल.का? कारण त्याने ओंगळाला अनुसरण्याचे ठरविले.

12कसर ज्याप्रमाणे कापडाच्या तुकड्याचा नाश करते, तसाच मी एफ्राईमचा नाश करीन. लाकडाचा तुकडा सडून नष्ट होतो, तसेच मी यहूदाला नष्ट करीन.

13एफ्राईमने स्वत:चा आजार व यहूदाने स्वत:ची जखम पाहिली. म्हणून मदतीसाठी ते अश्शुरकडे गेले. त्यांनी सम्राटाला त्यांच्या समस्या सांगितल्या. पण तो सम्राट तुम्हाला बरे करु शकत नाही. तो तुमची जखम भरून काढू शकत नाही.

14का? एफ्राईमच्या दृष्टीने मी सिंहाप्रमाणे होणार आहे. यहूदा राष्ट्राला मी तरुण सिंहासारखा होणार आहे. मी, हो मी, त्यांचे फाडून तुकडे तुकडे करीन. मी त्यांचे हरण करीन. आणि कोणीही त्यांना माझ्यापासून वाचवू शकणार नाही.

15लोक त्यांचा अपराध कबूल करेपर्यंत आणि माझा शोध घेईपर्यंत मी माझ्या जागी परत जाईन. हो! त्यांच्या अडचणीच्या वेळी ते माझा कसून शोध करतील."

## परमेश्वराकडे परत येण्याची फळे

6 "चला! आपण परमेश्वराकडे परत जाऊ या! त्याने आपल्याला दुखविले, पण तोच आपल्याला बरे करील. त्याने आपल्याला जखमी केले, पण तोच त्यावर मलमपट्टी करील.

2दोन दिवसांनी तो आपल्याला जिवंत करील. आणि तिसऱ्या दिवशी उठवील मग आपण त्यांच्याजवळ राहू शकू.

3आपण परमेश्वराबद्दल जाणून घेऊ या परमेश्वराला समजून घ्यायचा कसून प्रयत्न करू या. पहाट येते हे जसे आपल्याला माहीत आहे, तसेच तो येत आहे, हेही आपल्याला माहीत आहे. जमिनीला पाणी पुरविणाऱ्या वसंतातील पावसाप्रमाणे परमेश्वर येईल."

## लोक निष्ठावान नाहीत

4"एफ्राईम व यहूदा, मी तुमचे काय करावे बरे? तुमची निष्ठा सकाळच्या धुक्याप्रमाणे आहे. प्रात:काळीच नाहीशा होणाऱ्या दवाप्रमाणे तुमची निष्ठा आहे.

5मी संदेष्ट्यांचा उपयोग करून लोकांसाठी नियम केले. माझ्या आज्ञेप्रमाणे लोकांना ठार मारले गेले. त्या निर्णयांतून चांगल्या गोष्टी निर्माण होतील.

6का? कारण मला निष्ठावंत प्रेम पाहिजे, बळी नको. लोकांनी होमार्पणे आणण्यापेक्षा, परमेश्वराला जाणून घ्यावे, असे मला वाटते.

7पण लोकांनी आदामासारखाच करार मोडला त्यांच्या देशातच त्यांनी माझा विश्वासघात केला.

8गिलाद दुष्कर्मे करणाऱ्यांची नगरी आहे. लोकांनी दुसऱ्यांना फसविले व ठार मारले.

9लुटारू ज्याप्रमाणे कोणावर तरी हल्ला करण्यासाठी वाट बघत लपून बसतात, त्याचप्रमाणे धर्मगुरु शेखमला जाणाऱ्या रस्त्यावर वाटसंरूची वाट बघतात. त्यांनी दुष्कृत्ये केली आहेत.

10इस्राएलमध्ये भयंकर गोष्ट मी पाहीली आहे. एफ्राईम परमेश्वराशी निष्ठावान नाही इस्राएल पापाने बरबटली आहे.

11यहूदा, तुझ्यासाठी सुगीची वेळ ठेवलेली आहे. माझ्या लोकांना मी कैदेतून परत आणीन, तेव्हा ती वेळ येईल."

7 "मी इस्राएलला बरे करीन. मगच लोकांना एफ्राईमच्या पापाविषयी कळून येईल. लोकांना शोमरोनाचा खोटेपणाही समजेल. त्या नगरीत ये जा करणाऱ्या चोरांबद्दलही लोकांना समजेल.

2मी त्यांचे अपराध लक्षात ठेवीन, असे त्या लोकांना वाटत नाही. त्यांची दुष्कृत्ये सगळीकडे पसरली आहेत. मला त्यांची पापे स्पष्ट दिसू शकतात.

3त्यांची दुष्कृत्ये त्यांच्या राजाला आनंद देतात. त्यांची दैवते त्यांच्या नेत्यांना खुश करतात.

4रोटीवाला रोट्या बनविण्यासाठी कणीक मळतो तो रोटी भट्टीत ठेवतो रोटी फुगत असताना तो आच मोठी ठेवत नाही. पण इस्राएलचे लोक तसे नाहीत. ते त्यांची आच नेहमीच मोठी ठेवतात.

5आमच्या राजाच्या दिवशी, ते आच जास्त मोठी करतात. ते पेयांच्या मेजवान्या देतात. मद्याच्या गरमीने नेत्यांना मळमळते. मग राजाही परमेश्वराच्या निंदकांत सामील होतो.

6लोक कट रचतात. त्यांची मने तापलेल्या भट्टीप्रमाणे उत्तेजित होऊन जळतात. त्यांच्या मनातील खळबळ रात्रभर जळत राहाते. आणि सकाळी ती अतितप्त विस्तवाप्रमाणे होते.

7ते तापलेल्या भट्टीप्रमाणे आहेत. त्यांनी त्यांच्या राज्यकर्त्यांचा नाश केला. त्यांचे सर्व राजे पडले पण एकानेही मदतीसाठी मला हाक मारली नाही."

## इस्राएलचा नाश केला जाणार आहे, हे इस्राएलला ठाऊक नाही

8"एफ्राईम राष्ट्राबरोबर मिसळतो तो दोन्हीकडून न भाजलेल्या भाकरीप्रमाणे आहे.

9परके एफ्राईमची शक्ती नष्ट करतात. पण एफ्राईमला ते कळत नाही. त्याच्यावर पिकलेले केस पसरले आहेत. पण ते त्याला माहीत नाही.

10एफ्राईमचा गर्व त्यांच्याविरुध्द बोलतो लोकांना खूपच अडचणी आहेत, तरी ते परमेश्वराकडे, त्यांच्या

परमेश्वराकडे परत जात नाहीत. ते मदतीसाठी त्याच्याकडे पाहात नाहीत.

11म्हणजेच एफ्राईम मूर्ख पारव्याप्रमाणे बेअक्क ल झाला आहे. लोकांनी मदतीसाठी मिसरला हाक मारली. ते मदत मागायला अश्शूरकडे गेले.

12ते मदतीसाठी त्या देशांकडे जातात खरे, पण मी त्यांना सापळ्यात पकडीन. मी माझे जाळे त्यांच्यावर फेकीन, आणि जाळ्यात अडकलेल्या आकाशातील पक्ष्याप्रमाणे मी त्यांना खाली आणीन. त्यांच्या करारांबद्दल मी त्यांना शिक्षा करीन.

13ते त्यांच्या दृष्टीने वाईट आहे. त्यांनी माझा त्याग केला. त्यांनी माझी आज्ञा पाळण्यांस नकार दिला म्हणून त्यांचा नाश होईल. मी त्या लोकांचे रक्षण केले. पण ते माझ्याविरुध्द खोटे बोलतात.

14मनापासून ते मला कधीही बोलावीत नाहीत. हो! ते त्यांच्या बिछान्यात रडतात आणि धान्य व नवीन मद्य मागताना ते स्वत:ला माझ्यापासून अलगच करतात मनाने ते माझ्यापासून दूर गेले आहेत.

15मी त्यांना शिकवण दिली आणि त्यांचे हात बळकट केले. पण त्यांनी माझ्याविरुध्द दुष्ट बेत रचले आहेत.

16ते मोडक्या धनुष्याप्रमाणे आहेत. त्यांनी दिशा बदलल्या पण ते परत माझ्याकडे आले नाहीत. त्यांचे नेते त्यांच्या सामर्थ्याबद्दल बढाई मारतात. पण ते तलवारीच्या वाराने मारले जातील.मग मिसरचे लोक त्यांना हसतील.

## मूर्तिपूजेने इस्राएलला नाशाकडे नेले

8 "रणशिंग फुंकून इषारा द्या परमेश्वराच्या घरावरील
गरुडाप्रमाणे व्हा. इस्राएल लोकांनी माझा करार मोडला
आहे त्यांनी माझे नियम पाळले नाहीत 2'परमेश्वरा, आम्ही
इस्राएलमधील लोक तुला ओळखतो' असे ते किंचाळून
मला म्हणतात. 3पण इस्राएलने चांगल्या गोष्टी नाकारल्या
म्हणून शत्रू त्याचा पाठलाग करतात. 4इस्राएल लोकांनी
त्यांचा राजा निवडला, पण सल्ला विचारण्यासाठी ते
माझ्याकडे आले नाहीत. इस्राएल लोकांनी नेते निवडले,
पण मी ओळखत असणाऱ्या लोकांची निवड त्यांनी केली
नाही. इस्राएल लोकांनी त्यांच्याजवळील सोन्या-चांदीचा
उपयोग स्वत:साठी मूर्ती तयार करण्याकंरिता केला. म्हणून
त्यांचा नाश होईल. 5–6शोमरोन, तुझे वासरू परमेश्वराने
नाकारले आहे परमेश्वर म्हणतो, 'मी इस्राएल लोकांवर
रागावलो आहे." इस्राएलच्या लोकांना त्यांच्या पापाबद्दल
शिक्षा केली जाईल काही कामगारांनी ते पुतळे घडविले
ते काही परमेश्वर नाहीत. शोमरोनच्या वासराचे तुकडे
तुकडे केले जातील 7इस्राएल लोकांनी मूर्खपणा केला. तो
वाऱ्याला पेरण्याप्रमाणे होता. म्हणून त्यांच्यावर संकटे
येतील-ते वावटळीचे पीक निर्माण करतील. शेतांत पीक
वाढेल, पण त्यापासून अन्न मिळणार नाही. जर काही
पिकलेच, तर परकेच ते खाऊन टाकतील.

8कोणालाही नको असलेल्या ताटासारखा इस्राएल असल्यामुळे त्याचा नाश केला गेला.इस्राएलला दूर फेकण्यात आले. म्हणून इस्राएल लोक इतर राष्ट्रांत विखुरले गेले.

9एफ्राईम त्याच्या 'प्रेमिकाकडे' गेला. रानटी गाढवाप्रमाणे तो अश्शूरकडे भटकला गेला.

10इस्राएल लोक इतर राष्ट्रांतील आपल्या 'प्रियकरांकडे' गेले. पण मी इस्राएलींना एकत्र गोळा करीन. पण त्या सामर्थ्यवान राजाच्या ओझ्यामुळे त्यांना थोडासा त्रास झालाच पाहिजे.

## इस्राएल देवाला विसरून मूर्तींना पुजतो

11एफ्राईमने पुष्कळ वेद्या बांधून पापच केले. त्या वेद्या एफ्राईमच्या पापाच्या वेद्या बनल्या आहेत.

12मी एफ्राईमसाठी जरी 10,000 नियम लिहिले, पण एफ्राईमने ते परक्यासाठी असल्याप्रमाणे मानले.

13इस्राएलींना बळी देणे आवडते. ते मांसाचा नैवेद्य दाखवून ते खातात. परमेश्वर त्यांनी दिलेले बळी स्वीकारीत नाही. त्याला त्यांची पापे स्मरतात. म्हणून तो त्यांना शिक्षा करील. कैदी म्हणून त्यांना मिसरला नेण्यात येईल.

14इस्राएलने राजवाडे बांधले. पण तो आपल्या कर्त्याला विसरला आता यहूदा गढ्या बांधतो आहे. पण मी यहूदातील गावाला आग लावीन आणि ती आग त्या गढ्यांना बेचिराख करील!"

## परागंदा अवस्थेचे दुःख

9 इस्राएल, इतर राष्ट्राप्रमाणे आनंदोत्सव करू नकोस.
आनंदात राहू नकोस! तू वेश्येप्रमाणे वागलास आणि
देवाचा त्याग केलास. प्रत्येक खळ्यावर तू व्यभिचाराचे
पाप केलेस.* 2पण त्या खळ्यांतील धान्य इस्राएलला
पुरणार नाही. इस्राएलला पुरेसे मद्य मिळणार नाही.

3इस्राएली परमेश्वराच्या भूमीत राहणार नाहीत. एफ्राईम
मिसरला परत जाईल. अश्शूरमध्ये त्यांना निषिध्द भक्ष्य
भक्षण करावे लागेल. 4इस्राएल लोक देवाला मद्य अर्पण
करणार नाहीत. ते परमेश्वराला बळी अर्पण करणार
नाहीत. त्यांचे बळी प्रेत संस्कारात खाल्ले जाणाऱ्या
अन्नसारखे असतील. जो कोणी ते खातो तो अशुध्द होतो.
त्यांच्या भाकरी परमेश्वराला मंदिरात पोचणार नाहीत.
त्या त्यांनाच खाव्या लागतील. 5ते (इस्राएली) परमेश्वराच्या
सुट्या व समारंभ साजरे करू शकणार नाहीत.

6इस्राएल लोक निघून गेले. कारण शत्रूने त्यांच्याकडून सर्वकाही घेतले. पण मिसर त्यांचा स्वीकार करील. मोफ

---

**व्यभिचाराचे पाप केले** ह्याचा अर्थ असा की लोक देवाशी विश्वासू नव्हते. परंतु ह्याचा असाही अर्थ होतो की लोकांनी मंदीरातील वेश्याबरोबर लैंगिक संबंध केला. त्यांची खोटी दैवते त्यांना पुष्कळ संतती व उत्तम पिक देईल असा त्यांनी विश्वास ठेवला होता.

त्यांना मूठमाती देईल. त्यांच्या चांदीच्या खजिन्यांवर रानटी झुडुपे वाढतील. इस्राएल लोकांच्या राहण्याच्या ठिकाणी काटे उगवतील.

### इस्राएलने खऱ्या संदेष्ट्यांना नाकारले

7संदेष्टा म्हणतो, “इस्राएला, ह्या गोष्टी जाणून घे. शिक्षेची वेळ आली आहे. तुझ्या कुकर्मांची किंमत मोजण्याची वेळ आली आहे.” पण इस्राएलचे लोक म्हणतात, “संदेष्टे मूर्ख आहे. देवाचेच आत्मे असलेला हा माणूस वेडा आहे.” संदेष्टा म्हणतो, “तुमच्या दुष्कृत्यांबद्दल तुम्हाला शिक्षा होईल. तुमच्या तिरस्काराची सजा तुम्हाला मिळेल.” 8परमेश्वर आणि संदेष्टा एफ्राईम वर लक्ष ठेवण्याऱ्या रखवालदाराप्रमाणे आहेत. पण रस्ताभर अनेक सापळे आहेत. आणि लोक संदेष्ट्याचा त्याच्या परमेश्वराच्या घरातसुध्दा, तिरस्कार करतात.

9गिबाच्या घटनेमध्ये इस्राएल लोक जितके दुष्ट होते तितकेच ते (आजही) आहेत. परमेश्वर त्यांची पापे स्मरेल व त्यांना त्याबद्दल शिक्षा करील.

### मूर्तिपूजेमुळे इस्राएलचा विद्ध्वंस झाला

10वाळवंटातील ताज्या द्राक्षांप्रमाणे त्यावेळी इस्राएल होता. तुमचे पूर्वज मोसमातील अंजिराच्या पहिल्या बहराप्रमाणे मला दिसले. पण मग ते बाल-पौरा कडे आले आणि ते बदलले. ते कुजल्यासारखे झाले ते ज्यांच्यावर प्रेम करीत त्या भयंकर गोष्टीसारखे (दैवतांसारखे) झाले.

### इस्राएलांना संतान होणार नाही

11एफ्राईमचे वैभव पक्षाप्रमाणे दूर उडून जाईल तेथे गर्भधारणा होणार नाही, प्रसूतीही होणार नाहीत आणि म्हणून बालकेही असणार नाहीत. 12पण जरी इस्राएलींनी मुले वाढविली तरी त्याचा काही उपयोग होणार नाही. मी त्यांना मुलांचा वियोग घडवीन. त्यांना सोडून देईन. पण त्यांना संकटाशिवाय काही मिळणार नाही.

13–14एफ्राईम आपल्या मुलांना सापळ्याकडे नेत आहे, हे मी पाहू शकतो एफ्राईम आपली मुले मारेकऱ्यापुढे आणतो. परमेश्वर, त्यांना तुझ्या इच्छेप्रमाणे दे. गर्भपात होणारी गर्भाशये दे दूध न देणारे स्तन दे.

15त्यांची सर्व पापे गिल्गालमध्ये आहेत. म्हणून तेथपासूनच मला त्यांचा तिरस्कार वाटू लागला. मी त्यांना बळजबरीने माझे घर सोडायला लावीन. कारण ते दुष्कृत्ये करतात. ह्यापुढे मी त्यांच्यावर प्रेम करणार नाही. त्यांचे नेते बंडखोर आहेत. ते माझ्याविरुध्द गेले आहेत.

16एफ्राईमला शिक्षा होईल. त्यांचे मूळ मरत आहे. ते नि:संतान होतील. ते बालकांना कदाचित् जन्म देतील, पण त्यांच्या पोटी जन्मलेल्या अमूल्य बालकांना मी ठार मारीन.

17ते लोक माझ्या परमेश्वराचे ऐकणार नाहीत. म्हणून तोही त्यांचे ऐकणार नाही. आणि ते बेघर होऊन राष्ट्रा-राष्ट्रांतून भटकतील.

### इस्राएलच्या संपत्तीने त्याला मूर्तिपूजेकडे नेले

10 इस्राएल बहरलेल्या द्राक्षवेलीप्रमाणे आहे. त्याला परमेश्वराकडून पुष्कळ गोष्टी मिळत गेल्या पण त्याने दैवतांच्या देवांच्या मानासाठी खूपखूप वेद्या बांधल्या. त्याची भूमी अधिकाधिक चांगली होत गेली, तेव्हा त्याने अधिक चांगले स्तंभ दैवतांच्या मानासाठी उभे केले.

2इस्राएलाच्या लोकांनी परमेश्वराला फसविण्याचा प्रयत्न केला. पण आता त्यांनी त्यांचा अपराध कबूल केलाच पाहिजे. परमेश्वर त्यांच्या वेद्या मोडेल. तो त्यांच्या स्मारक स्तंभांचा नाश करील.

### इस्राएलींचे दुष्ट निर्णय

3आता इस्राएल लोक म्हणतात, “आम्हाला राजा नाही आम्ही परमेश्वराला मानत नाही. त्याचा राजा आमच्यासाठी काही करू शकत नाही.”

4ते वचने देतात पण ते फक्त खोटे बोलत असतात. ते आपला शब्द पाळत नाहीत. ते दुसऱ्या देशांबरोबर करार करतात. परमेश्वराला ते करार आवडत नाहीत. न्यायाधीश नांगरलेल्या शेतात वाढणाऱ्या विषारी तणाप्रमाणे आहेत.

5शोमरोनमधील लोक बेथ:आवेन येथील वासरांची पूजा करतात. ते लोक अक्षरश: रडतील. ते याजकही खरोखरी रडतील. का? कारण त्यांची सुंदर मूर्ती नाहीशी झाली. ती दूर नेली गेली. 6ती मूर्ती अश्शूरच्या महान राजाला भेट म्हणून नेली गेली तो, एफ्राईमची लज्जास्पद मूर्ती ठेवील. इस्राएलला आपल्या मूर्तीची लाज वाटेल. 7शोमरोनच्या दैवतांचा नाश केला जाईल पाण्यावर तरंगणाऱ्या लाकडाच्या तुकड्याप्रमाणे त्यांची दशा होईल.

8इस्राएलाने पाप केले आणि उच्चस्थाने बांधली. आवेन मधील उच्चस्थानांचा नाश केला जाईल त्यांच्या वेदीवर काटेकुटे व तण वाढतील मग ते पर्वतांना म्हणतील, “आम्हाला झाका” आणि टेकड्यांना म्हणतील, “आमच्यावर पडा.”

### इस्राएलला पापाची किंमत मोजावी लागेल

9इस्राएल, गिबाच्या काळापासून तू पाप केले आहेस ते लोक तेथे पाप करीतच राहिले. गिबातील ते दुष्ट युध्दात खरोखरी पकडले जातील. 10मी त्यांना शिक्षा करण्यासाठी येईन सैन्ये त्यांच्या विरोधात गोळा होतील. ती इस्राएलींच्या दोन्ही पापाबद्दल त्यांना शिक्षा करतील.

11एफ्राईम शिकविलेल्या तरुण कालवडीप्रमाणे आहे. तिला खळ्यातील धान्यावरून चालायला आवडते. मी तिच्या गळ्यात चांगले जोखड अडकवीन. एफ्राईमला दोराने

बांधीन मग यहूदा नांगरणी करील याकोब स्वत: ढेकळे
फोडील.
12जर तुम्ही चांगुलपणा पेरलात, तर तुम्हाला खऱ्या
प्रेमाचे पीक मिळेल तुमचे शेंत नांगरा तुम्हाला परमेश्वरासह
पीक मिळेल. तो येईल आणि पावसाप्रमाणे तुमच्यावर
चांगुलपणाचा वर्षाव करायला लावील.
13पण तुम्ही पाप पेरले, म्हणून तुम्हाला अडचणींचे
पीक मिळाले तुम्हाला तुमच्या खोटेपणाचे फळ मिळाले.
का? कारण तुम्ही तुमच्या शक्तीवर आणि तुमच्या
सैनिकांवर विश्वास ठेवला. 14म्हणून तुमच्या सैन्याला
रणशिंग ऐकू येईल तुमच्या सर्व गढ्यांचा नाश होईल. तो
नाश, शल्मनाने जसा बेथ–आर्बेलचा नाश केला, तसा
असेल. त्या युध्दाच्या वेळी, आया मुलांबरोबर ठार मारल्या
गेल्या. 15आणि हे सर्व तुझ्याबाबतीत बेथेल येथे घडेल.
का? कारण तुम्ही खूप पापे केली. तो दिवस उजाडताच
इस्राएलच्या राजाचा संपूर्ण नाश होईल.

## इस्राएल परमेश्वराला विसरला आहे

11 परमेश्वर म्हणाला, "इस्राएल लहान बालक
असताना, मी (परमेश्वराने) त्यांच्यावर प्रेम केले.
आणि मी माझ्या मुलाला मिसरबाहेर बोलाविले.
2पण मी जितके अधिक इस्राएलींना बोलाविले, तितके
जास्त ते मला सोडून गेले. त्यांनी बआलाना बळी अर्पण
केले. मूर्ती पुढे धूप जाळला.
3"एफ्राईमला चालावयाला शिकविणारा मीच होतो. मी
इस्राएलींना हातांवर उचलून घेतले. मी त्यांना बरे केले.
पण त्यांना त्याची जाणीव नाही.
4मी त्यांना दोऱ्यांनी बांधून नेले. पण त्या प्रेमाच्या
दोऱ्या होत्या. मी त्यांना मुक्त करणाऱ्या माणसाप्रमाणे
होतो. मी खाली वाकून त्यांना जेवू घातले.

5"परमेश्वराकडे परत येण्यास इस्राएल लोकांनी नकार
दिला म्हणून ते मिसरला जातील अश्शूरचा राजा त्यांचाही
राजा होईल. 6त्यांच्या गावांवर टांगती तलवार राहील.
त्यांच्या सामर्थ्यवान पुरुषांना ती मारील त्यांच्या नेत्यांचा
ती नाश करील.
7"मी परत यावे अशी माझ्या लोकांची अपेक्षा आहे.
वरच्या परमेश्वराला ते बोलवतील पण देव त्यांना मदत
करणार नाही."

## इस्राएलचा नाश करण्याची परमेश्वराची इच्छा नाही

8"एफ्राईम, तुला सोडून देण्याची माझी इच्छा नाही.
इस्राएल, तुझे रक्षण करावे असे मला वाटते. अदमाह
किवा सबोईम यांच्यासारखी तुझी स्थिती करावी असे
मला वाटत नाही. माझे मन:परिवर्तन होत आहे.
तुझ्याबद्दलचे माझे प्रेम अतिशय उत्कट आहे.
9मी, माझ्या भयंकर क्रोधाचा, विजय होऊ देणार नाही.
मी पुन्हा एफ्राईमचा नाश करणार नाही. मी मानव नसून
परमेश्वर आहे. मी तुमच्यामधला एकमेव पवित्र आहे मी
तुमच्याबरोबर आहे. मी माझा क्रोध प्रकट करणार नाही.
10मी सिंहासारखी डरकाळी फोडीन. मी डरकाळी
फोडताच, माझी मुले माझ्यामागून येतील ती पश्चिमेकडून
भयाने थरथर कापत येतील.
11ती मिसरमधून घाबरलेल्या पाखरांप्रमाणे फडफड
करीत येतील. अश्शूरमधून भयभीत होऊन कबुतरांप्रमाणे
येतील. मग मी त्यांना घरी परत नेईन." परमेश्वर असे
म्हणाला आहे.
12"एफ्राईमच्या दैवतांनी मला घेरून टाकले. इस्राएलच्या
लोकांनी माझ्याकडे पाठ फिरविली. म्हणून त्यांचा नाश
झाला. पण यहूदा अजून एल बरोबरच चालत आहे.
यहूदा पवित्रांशी निष्ठावंत आहे."

## परमेश्वर इस्राएलच्याविरुध्द आहे

12 एफ्राईम त्याचा वेळ वाया घालवीत आहे–इस्राएल
दिवसभर "वाऱ्याचा पाठलाग करतो." लोक
अधिकाधिक खोटे बोलतात. ते जास्तीतजास्त चोऱ्या
करतात. त्यांनी अश्शूरशी करार केले आहेत. आणि ते
जैतून तेल मिसरला नेत आहेत.
2परमेश्वर म्हणतो, "माझे इस्राएलशी भांडण आहे.
याकोबला त्याच्या कर्माबद्दल सजा मिळालीच पाहिजे.
त्याने केलेल्या वाईट कृत्यांबद्दल त्याला शिक्षा झालीच
पाहिजे. 3याकोबने आईच्या गर्भात असल्यापासूनच त्याच्या
भावाला फसवायला सुरवात केली. याकोब शक्तिशाली
तरुण होता. त्या वेळी तो परमेश्वराविरुध्द लढला.
4याकोबने देवदूताशी मल्लयुध्द खेळले आणि तो जिंकला
तो रडला व त्याने कृपा करण्याची याचना केली. हे
बेथेलमध्ये घडले. तेथे तो आमच्याशी बोलला. 5हो, खरेच,
यहोवा सैन्यांचा परमेश्वर आहे. त्याचे नाव यहोवा
(परमेश्वर) असे आहे. 6म्हणून आपल्या परमेश्वराकडे
परत या. त्याच्याशी निष्ठा ठेवा. योग्य तेच करा. तुमच्या
परमेश्वरावर नेहमी विश्वास ठेवा.
7"याकोब, हा खरा व्यापारी आहे. तो त्याच्या मित्रांनासुध्दा
फसवितो त्याचे तराजू सुध्दा खोटे आहेत. 8एफ्राईम म्हणाला,
'मी श्रीमंत आहे. मला खरी संपत्ती सापडली आहे. माझे
अपराध कोणालाही कळणार नाहीत. कोणालाही माझी
पापे समजणार नाहीत.'
9"पण तुम्ही मिसरमध्ये असल्यापासून, मी परमेश्वर
तुमचा परमेश्वर आहे. सभामंडपाच्या वेळेप्रमाणे तुम्हाला
तंबूत राहायला भाग पाडीन.10मी संदेष्ट्यांशी बोललो मी
त्यांना पुष्कळ दृष्टान्त दिले. माझी शिकवण तुम्हाला
शिकविण्यासाठी मी त्यांना अनेक मार्ग दाखविले. 11पण
गिलादाच्या लोकांनी पाप केले आहे. तेथे पुष्कळ भयानक
मूर्ती आहेत. गिल्गालमध्ये लोक बैलांना बळी अर्पण

करतात. त्यांच्या अनेक वेदी आहेत. नांगरलेल्या शेतात ज्याप्रमाणे ढेकळांच्या रांगा असतात, त्याप्रमाणे त्यांच्या वेदींच्या रंगाच्या रांगा आहेत.

12“याकोब अरामला पळून गेला. त्या जागी, इस्राएलने पत्नीसाठी सेवा केली. दुसरी पत्नी मिळावी म्हणून त्याने मेंढ्या पाळल्या. 13पण परमेश्वराने संदेष्ट्यांच्या साहाय्याने इस्राएलला मिसरमधून बाहेर आणले. संदेष्ट्यांचा उपयोग करून देवाने इस्राएलला सुरक्षित ठेवले. 14पण एफ्राईम परमेश्वराच्या रागास कारणीभूत झाला एफ्राईमने अनेक लोकांना ठार केले. म्हणून त्याला त्याच्या अपराधांबद्दल शिक्षा होईल. त्याचा प्रभू (परमेश्वर) त्याला अपमान सहन करायला लावील.”

### इस्राएलने आपला नाश स्वत:च करून घेतला

13 “इस्राएलमध्ये एफ्राईमने स्वत:चे महत्व वाढविले तो बोलत असे व लोक भीतीने थरथर कापत. पण एफ्राईमने पाप केले त्याने बआल देवताला पूजणे सुरु केले. 2ते इस्राएली अधिकच पाप करतात. ते स्वत:साठी मूर्ती तयार करतात. कारागीर चमत्कृतिपूर्ण चांदीच्या मूर्ती घडवितात व ते लोक त्या मूर्तीशी बोलतात. ते त्या मूर्तीपुढे बळी देतात. सोन्याच्या वासरांचे ते चुंबन घेतात. 3ह्याच कारणामुळे ते लोक लवकरच अदृश्य होतील. सकाळच्या धुक्याप्रमाणे त्यांची स्थिती होईल. सकाळी धुके थोड्यावेळ दिसते. व लगेच नाहीसे होते. इस्राएलींची दशा खळ्यातून उडणाऱ्या फोलकटाप्रमाणे होईल. धुराड्यातून निघणारा धूर काही क्षणातच दिसेनासा होतो, तसे त्यांचे होईल.

4“तुम्ही मिसर देशात असल्यापासून मी परमेश्वर तुमचा परमेश्वर आहे माझ्याशिवाय दुसरा देव तुम्हाला माहीत नव्हता. ज्याने तुम्हाला वाचविले तो मीच. 5वाळवंटात, त्या रूक्ष प्रदेशात, मी तुम्हाला ओळखले. 6मी इस्राएल लोकांना अन्न दिले. त्यांनी ते खाल्ले व ते संतुष्ट झाले, तृप्त झाले. ते गर्विष्ठ झाले आणि ते मलाच विसरले.

7“म्हणूनच मी त्यांच्याशी सिंहासारखा वागेन. रस्त्यावर दबा धरून बसलेल्या चित्याप्रमाणे मी होईन. 8जिची पिल्ले तिच्यापासून हिरावून घेतली गेली आहेत अशी अस्वलाची मादी जसा हल्ला करील, तसाच मीही त्यांच्यावर तुटून पडेन. मी त्यांच्यावर चढाई करीन. मी त्यांच्या छाती फाडीन. सिंह किंवा इतर हिंस्र पशू आपली शिकार जशी फाडून खातात तसेच मी करीन.”

### परमेश्वराच्या क्रोधापासून इस्राएलला कोणीही वाचवू शकणार नाही

9“इस्राएल, मी तुला मदत केली. पण तू माझ्याविरुध्द गेलास म्हणून आता मी तुझा नाश करीन. 10तुझा राजा कोठे आहे? तुझ्या सर्व नगरांत तो तुला वाचवू शकत नाही. तुझे न्यायाधीश कोठे आहेत? ‘मला राजा व नेते दे’ अशी विनवणी तू केली होतीस. 11मी रागावलो आणि तुला राजा दिला. माझा क्रोध अधिक भडकताच, मी तुझा राजा काढून घेतला.

12“एफ्राईमने आपला अपराध लपविण्याचा प्रयत्न केला. त्याचे पाप म्हणजे गुप्त गोष्ट हे असे त्याला वाटले पण त्याच्या पापाची शिक्षा त्याला मिळेल.

13त्याची शिक्षा प्रसूतिवेदनांप्रमाणे असेल. तो सुज्ञ मुलगा नसेल त्याची जन्मवेळ येईल, तेव्हा तो वाचणार नाही.

14“मी त्यांना थडग्यापासून वाचवीन मी त्यांचा मृत्यूपासून बचाव करीन. मरणा, तुझी रोगराई कोठे आहे? थडग्या, तुझी शक्ती कोठे गेली? मला सूड घ्यायचा नाही.

15इस्राएल त्याच्या भावांत वाढतो आहे. पण पूर्वेकडून जोराचा वारा येईल. परमेश्वराचा वारा वाळवंटाकडून वाहील. मग इस्राएलची विहीर आटून जाईल. त्याचा झरा कोरडा पडेल. वारा इस्राएलच्या खजिन्यातील प्रत्येक मौल्यवान वस्तू काढून घेईल.

16शोमरोनला शिक्षा झालीच पाहिजे, का? कारण तिने परमेश्वराकडे पाठ फिरविली. इस्राएली तलवारीला बळी पडतील. त्यांच्या मुलांची खांडोळी केली जाईल. त्यांच्या गर्भवती स्त्रियांना फाडून टाकले जाईल.”

### परमेश्वराकडे परतणे

14 इस्राएला, तू पडलास. तू परमेश्वराविरुध्द पाप केलेस. पण आता परमेश्वराकडे, तुझ्या परमेश्वराकडे, परत ये. 2तू ज्या गोष्टी बोलणार आहेस, त्याबद्दल विचार कर व परमेश्वराकडे परत ये.

“त्याला सांग की आमचे पाप धुवून टाक आम्ही करीत असलेल्या चांगल्या गोष्टीं चा स्वीकार कर. आम्ही आमच्या ओठांद्वारे तुझी स्तुती करू.

3“अश्शूर आम्हाला वाचविणार नाही. आम्ही घोड्यांवर स्वार होणार नाही. आम्ही हातांनी बनविलेल्या गोष्टींना ‘आमचा देव’ असे पुन्हा म्हणणार नाही का? कारण अनाथांवर करुणा करणारा तूच एकमेव आहेस.”

### परमेश्वर इस्राएलला क्षमा करील

4परमेश्वर म्हणतो, “त्यानी माझा त्याग केला तरी मी त्यांना ह्या गोष्टीबद्दल क्षमा करीन. मी मोकळेपणाने त्यांच्यावर प्रेम करीन. आता मी त्यांच्यावर रागावलो नाही.

5मी इस्राएलासाठी दहिवराप्रमाणे होईन. इस्राएल लिलीप्रमाणे फुलेल, लबानोनमधील गंधसरूंप्रमाणे तो फोफावेल.

6त्याच्या फांद्यांचा विस्तार होईल व तो जैतुनाच्या सुंदर वृक्षाप्रमाणे होईल. लंबानोनमधील गंधसरूंच्या गंधाप्रमाणे त्याचा सुवास असेल.

[7]इस्राएलचे लोक, पुन्हा, माझ्या सुरक्षिततेत राहातील ते
धान्याप्रमाणे वाढतील ते वेलीप्रमाणे विस्तारतील. ते
लबानोनमधील द्राक्षारसाप्रमाणे होतील."

## परमेश्वर इस्राएलला मूर्तीबद्दल ताकीद देतो

[8]"एफ्राईम, माझा (परमेश्वराचा) मूर्तीशी काहीही संबंध
असणार नाही. तुमच्या प्रार्थनेला उत्तर देणारा मीच एकमीच
आहे. फक्त मीच तुमच्यावर लक्ष ठेवतो. मी सदाहरित
देवदारूसारखा आहे. माझ्यामुळे तुम्हाला फळ मिळते."

## अखेरचा सल्ला

[9]शहाण्या माणसाला या गोष्टी समजतात. चलाख
माणसाने या गोष्टी शिकाव्या परमेश्वराचे मार्ग योग्य
आहेत. त्यामुळे सज्जन जगतील व दुर्जन मरतील.

# License Agreement for Bible Texts

***World Bible Translation Center***
***Last Updated: September 21, 2006***

Copyright © 2006 by World Bible Translation Center
All rights reserved.

**These Scriptures:**

- Are copyrighted by World Bible Translation Center.
- Are not public domain.
- May not be altered or modified in any form.
- May not be sold or offered for sale in any form.
- May not be used for commercial purposes (including, but not limited to, use in advertising or Web banners used for the purpose of selling online add space).
- May be distributed without modification in electronic form for non-commercial use. However, they may not be hosted on any kind of server (including a Web or ftp server) without written permission. A copy of this license (without modification) must also be included.
- May be quoted for any purpose, up to 1,000 verses, without written permission. However, the extent of quotation must not comprise a complete book nor should it amount to more than 50% of the work in which it is quoted. A copyright notice must appear on the title or copyright page using this pattern: "Taken from the HOLY BIBLE: EASY-TO-READ VERSION™ © 2006 by World Bible Translation Center, Inc. and used by permission." If the text quoted is from one of WBTC's non-English versions, the printed title of the actual text quoted will be substituted for "HOLY BIBLE: EASY-TO-READ VERSION™." The copyright notice must appear in English or be translated into another language. When quotations from WBTC's text are used in non-saleable media, such as church bulletins, orders of service, posters, transparencies or similar media, a complete copyright notice is not required, but the initials of the version (such as "ERV" for the Easy-to-Read Version™ in English) must appear at the end of each quotation.

Any use of these Scriptures other than those listed above is prohibited. For additional rights and permission for usage, such as the use of WBTC's text on a Web site, or for clarification of any of the above, please contact World Bible Translation Center in writing or by email at distribution@wbtc.com.

World Bible Translation Center
P.O. Box 820648
Fort Worth, Texas 76182, USA
Telephone: 1-817-595-1664
Toll-Free in US: 1-888-54-BIBLE
E-mail: info@wbtc.com

**WBTC's web site –** World Bible Translation Center's web site: http://www.wbtc.org

**Order online –** To order a copy of our texts online, go to: http://www.wbtc.org

**Current license agreement –** *This license is subject to change without notice. The current license can be found at:* http://www.wbtc.org/downloads/biblelicense.htm

**Trouble viewing this file –** If the text in this document does not display correctly, use Adobe Acrobat Reader 5.0 or higher. Download Adobe Acrobat Reader from: http://www.adobe.com/products/acrobat/readstep2.html

**Viewing Chinese or Korean PDFs –** To view the Chinese or Korean PDFs, it may be necessary to download the Chinese Simplified or Korean font pack from Adobe. Download the font packs from: http://www.adobe.com/products/acrobat/acrrasianfontpack.html